पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 11/11/2019 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरीत्या विदेशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक 10/11/2019 रोजी ठाणेदार पो. स्टे. केळवद सपोनि श्री. सुरेश मट्टामी यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, एक पांढऱ्या रंगाची स्विफट डिझायर कार मध्ये विदेशी दारू भरून पांढुर्णा ते नागपूरच्या दिशेने वाहतुक करीत आहे. अशा खबरे वरुन सपोनि श्री. सुरेश मट्टामी हे पो.स्टे. केळवद स्टाफ सह पो. स्टे. स्टाफसह पेट्रालींग करीत असतांना हायवे क्र. 47 वरील बिहाडा फाटा येथे नाकाबंदी लावून वाहन तपासात असतांना 17:45 वा. दरम्यान एक पांढऱ्या रंगाची स्विफट डिझायर कार नाकाबंदीच्या दिशेने भरधाव वेगाने येतांना दिसली. एमएच–31/डिके–2872 क्रमांकाच्या स्विफट डिझायर कार चालकाला थांबविण्याचा ईशारा देवून गाडीची पाहणी केली असता समोरच्या सिटवर आरोपी क्र. 1) राजु जानराव गुंड, वय 45 वर्ष, रा. रामनगर वार्ड क्र. 2, वर्धा व 2) प्रवीण नरेश नाईक, वय 42 वर्ष, रा. सिद्धार्थ नगर टेका नाका नागपूर हे दोघेही बसुन दिसले. सदर आरोपीच्या वाहनाच्या डिक्कीमध्ये पांढऱ्या रंगाचे प्लॉस्टीक पोत्यामध्ये ऑफीसर चॉईस विदेशी दारू 90 मि. ली प्रत्येकी भरलेली एकुण 2784 प्लास्टीक बॉटल कि. 2,78,400/–रू. असा एकुण वाहनासह कि. 5,78,400/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.पोलीस स्टेशन केळवद येथे कलम 65 (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोलिस नाईक राजेन्द्र रेवतकर हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, नापोशी राजेन्द्र रेवतकर, पोशि सचिन येडकर, चानापोशि गुनेश्वर डाखोळे, होमगार्ड सैनिक रोशन झाडे, अतुल कोल्हे यांनी केली आहे.



# अपघातात मृत्यू

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील मौजा मोहदरा, रेल्वे कॉसिंग येथे दिनांक 10/11/2019 चे 08:00 वा. दरम्यान एमएच–40/एसआर–5647 क्रमांकाची मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– राजेश टिकाराम पराते, वय 40 वर्ष, रा. शेषगनर, बम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी याने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्यानंतर त्याचे वाहनातुन नियंत्रण सुटले. दरम्यान सदर वाहन खड्डयात पडल्यानंतर राजेश जराते याच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अमोल मधुकर निमजे, वय 30 वर्ष, रा. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मंडवाले 9763584548 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर